# खासगी विकसकाने किमान एक एसआरए प्रकल्प हाती घ्यावा

## डॉ. नितीन करीर यांची अपेक्षा

**प्रतिनिधी, पुणे**

**पुणे आणि** पिंपरी-चिंचवड शहरातील सुमारे ४० टक्के लोकसंख्या स्वखुशीने झोपडपट्टीमध्ये राहात नाही. शहराचे सामाजिक स्वास्थ्य सांभाळायचे असेल तर नागरिकांना चांगले राहणीमान आणि सुविधा देणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येक खासगी विकसकाने किमान एक झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प (एसआरए) हाती घ्यावा, अशी अपेक्षा नगरविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. नितीन करीर यांनी व्यक्त केली.



नाईकनवरे डेव्हलपर्सच्या 'परिवर्तन' या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प कार्यक्रमात डॉ. नितीन करीर यांच्या हस्ते झोपडपट्टीधारकांना सदनिकांचे हस्तांतरण करण्यात आले.

नाईकनवरे डेव्हलपर्सच्या 'परिवर्तन' या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाच्या कार्यक्रमात करीर यांच्या हस्ते सदनिकांचे हस्तांतरण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. महानगरपालिका आयुक्त सौरभ राव, क्रेडाईचे राष्ट्रीय अध्यक्ष सतीश मगर, क्रेडाई महाराष्ट्रचे उपाध्यक्ष श्रीकांत परांजपे, नगर अभियंता प्रशांत वाघमारे, म्हाडाचे अशोक पाटील, महापालिका सभागृह नेते श्रीनाथ भिमाले, नाईकनवरे डेव्हलपर्सचे संचालक हेमंत नाईकनवरे, रणजित नाईकनवरे या वेळी उपस्थित होते. करीर म्हणाले, क्रेडाई आणि महाराष्ट्र चेंबर ऑफ हाउसिंग इंडस्ट्रीच्या सदस्यांनी किमान एक झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प हाती घेत शहराच्या विकासासाठी हातभार लावावा.

बांधकाम क्षेत्राची परिस्थिती सध्या तितकीशी चांगली नसली तरी तीन-चार बांधकाम व्यावसायिक एकत्र येऊन प्रकल्प हाती घेऊ शकतील. हेमंत नाईकनवरे यांनी प्रास्ताविक केले. रणजित नाईकनवरे यांनी आभार मानले. सुधीर गाडगीळ यांनी सूत्रसंचालन केले.